**सरकार –वि– अशोक कोकेरवार+ १**

| | | | |
|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | : | २०/०५/२०२३ |
| | नोंदणी दिनांक | : | २०/०५/२०२३ |
| | निकाल दिनांक | : | २३/०३/२०२६ |
| | कालावधी | : | व. म. दि.<br>०२ १० ०३ |

CNR NO.MHGA13-000371-2023. **निशाणी क्र. ३३**

**नमुना क्र. XXXII**
**भाग 'अ'**
**(न्यायनिर्णयाचे शीर्षक पृष्ठ)**
**[फौजदारी नियमावली प्रकरण VIपरिच्छेद 44(i)]**

| **अतिरिक्त सत्र न्यायाधीश, अहेरी, जिल्हा गडचिरोली येथील न्यायालयात<br>पीठासीन अधिकारी :– रोहन बा. रेहपाडे, न्यायाधीश.** | | |
|---|---|---|
| | न्यायनिर्णयाची तारीख :– २३/०३/२०२६<br>**सत्र खटला क्र. १७१/२०२३**<br>**(जुना विशेष खटला क्र.४६/२०२३)** | |
| | प्रथम खबर/गुन्हा क्र. ०७/२०२३<br>मुलचेरा पोलीस स्टेशन | |
| फिर्यादी/<br>अभियोग पक्ष | | **महाराष्ट्र सरकार**<br>तर्फे मुलचेरा पोलीस स्टेशन |
| प्रतिनिधीत्व करणार | | सरकारी अभियोक्ता श्री. एस.डी. गावडे |

| | | |
|---|---|---|
| आरोपी | | **१. अशोक दुर्गय्या कोकेरवार**<br>वय – ४८ वर्षे,<br>व्यवसाय – शेती,<br>**२. स्वप्नील अशोक कोकेरवार**<br>वय – २६ वर्षे,<br>व्यवसाय – शेती,<br>दोन्ही रा.बंदुकपल्ली, तालुका – मुलचेरा,<br>जिल्हा – गडचिरोली. |
| प्रतिनिधीत्व करणार | | विधीज्ञ श्री. यु. एस. गलबले |

**भाग 'ब'**

**[फौजदारी नियमावली प्रकरण VI परिच्छेद 44(ii )]**

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | २७/०१/२०२२ |
| प्रथम खबर तारीख | २८/०१/२०२३ |
| आरोपपत्र दाखल केल्याची तारीख | २०/०५/२०२३ |
| दोषारोप निश्चित केल्याची तारीख | २६/०३/२०२४ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख. | ११/०३/२०२६ |
| ज्या दिवशी न्यायनिर्णय राखून ठेवला आहे, ती तारीख | २३/०३/२०२३ |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णयाची तारीख | २३/०३/२०२६ |
| शिक्षा दिली असल्यास शिक्षेची तारीख | लागू नाही. |

**आरोपीची माहिती**

| आरोपीचा क्रमांक | आरोपीचे नांव | अटकेची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | गुन्हे दाखल | निर्दोष ठरविले की दोषी ठरविले | ठोठाविलेली शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ च्या उद्देशाने खटल्यादरम्यान अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १)<br>२) | अशोक दुर्गय्या कोकेरवार<br>स्वप्नील अशोक कोकेरवार | २४/०१/२०२३ | ०३/०३/२०२३ | भारतीय दंड संहीतेचे कलम ३०७ व ५०७ सहकलम ३४ अन्वये. | निर्दोष. | लागू नाही. | लागू नाही. |

**भाग 'ब'**

**[फौजदारी नियमावली प्रकरण VIपरिच्छेद 44(iii)]**

**अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयाचे साक्षीदार यांची यादी**

**अ. अभियोग पक्षाचे साक्षीदार :**

| क्रमांक | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| PW-1 | रमेश दुर्गय्या कोकेरवार (निशाणी क्र. P-27) | फिर्यादी साक्षीदार |

**ब. बचाव पक्षाचे साक्षीदार, असल्यास :**

| क्रमांक | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| | **कोणी नाही.** | -- |

**क. न्यायालयाचे साक्षीदार, असल्यास :**

| क्रमांक | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| | **कोणी नाही.** | -- |

**अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयाची निशाणी क्रमांकाची यादी**

**अ. अभियोग पक्षातर्फे निशाणी क्रमांक :**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १. | Exhibit No.P-28 | ग्रामीण रूग्णालय, मुलचेरा यांनी दिलेला जखमांचा अहवाल (बचाव पक्षाने मान्य केला) |
| २. | Exhibit No.P-29 | घटनास्थळ पंचनामा/गुन्हयाच्या तपशीलाचा नमुना (बचाव पक्षाने मान्य केला) |

**ब. बचाव पक्षातर्फे निशाणी क्रमांक :**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| | -- | -- |

**क. न्यायालयातर्फे निशाणी क्रमांक :**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| | -- | -- |

**ड. भौतिक वस्तू (Material Objects)**

| अ.क्र. | भौतिक वस्तू क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १. | १/२०२३ | १. रक्त मिश्रीत माती<br>२. साधी माती<br>३. एक लाकडी काठी ३४ इंच लांबीची<br>४. एक आकाशी रंगाचा फुल बायांचा शर्ट<br>५. एक लोखंडी पात्याची कु-हाड |

# न्यायनिर्णय

(दिनांक २३ मार्च, २०२६ रोजी पारित)

१. आरोपी क्र.१ अशोक दुर्गय्या कोकेरवार व आरोपी क्र.२ स्वप्नील अशोक कोकेरवार हे भारतीय दंड संहीतेचे कलम ३०७ व ५०७ सहकलम ३४ अन्वये शिक्षापात्र असलेल्या गुन्हयांच्या आरोपावरुन संपरिक्षेचा सामना करीत आहे.

२. अभियोग पक्षाचे असे कथन आहे की, दि.२७.०१.२०२३ रोजी सायंकाळी ७.०० वाजताचे दरम्यान फिर्यादी त्याचे कुटूंबासोबत अंगणात बसुन आपल्या घरासमोर इलेक्ट्रीक पोलवर बल्ब नाही त्यामुळे अंधार राहतो तर आपण लावून घेवू असे बोलत होते. त्याचवेळी त्यांचा मोठा भाउ आरोपी नामे अशोक दुर्गय्या कोकेरवार हा त्यांच्या बोलण्याचा आवाज ऐकुण त्यांचे अंगणात आला व त्यांना म्हणाला की, त्यांचा मुलगा ग्रामपंचायत मेंबर आहे म्हणुन तुम्ही असे बोलता का? असे म्हणत शिवीगाळ करू लागला तेव्हा लगेच त्यांचा आवाज ऐकुण त्यांचा मुलगा आरोपी क्र.२ स्वप्नील हा त्याच्या हातात कु–हाड धरून धावत त्यांच्या घराचे अंगणात आला व त्यांच्यासोबत कशाला झगडा भांडण करता म्हणुन शिवीगाळ करून हातातील कु–हाड उचलुन त्यांच्या डोक्यावर मारत असतांना त्यांचा मुलगा व त्यांची पत्नी यांनी कु–हाड धरण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांच्या डोक्यावर कु–हाड लागल्याने ते जखमी झाले. त्यानंतर दोन्ही आरोपींनी त्यांना लाथा बुक्क्यांनी छातीवर

मारहान केली व त्यांचा गळा दाबण्याचा प्रयत्न केला.

३. फिर्यादीने पहिली खबर दाखल केली. गुन्हा क्र.०७/२०२३ ची नोंद मुलचेरा पोलीस स्टेशनला भारतीय दंड संहीतेचे कलम ३०७ व ५०४ सहकलम ३४ नुसार दाखल करण्यात आला. तपासी अधिकारी यांनी घटनास्थळास भेट दिली आणि घटनास्थळ पंचनामा तयार केला. फिर्यादीची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. घटनास्थळावरून कु-हाड, लाकडी काठी, रक्त मिश्रीत माती व साधी माती पंचासमक्ष जप्त करण्यात आले आणि जप्तीपंचनामा तयार करण्यात आला. आरोपींना अटक करण्यात आली. साक्षीदारांचे बयाण नोंदविले. आरोपींविरूध्द भरपुर पुरावा आढळुन आल्याने त्यांच्याविरुद्ध गुन्ह्याचा तपास पूर्ण झाल्यानंतर भारतीय दंड संहीतेचे कलम ३०७ आणि ५०४ सहकलम ३४ अन्वये शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्याच्या आरोपावरुन दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

४. माझे सुविद्य पुर्वाधिकारी यांनी निशाणी क्र.२२ येथे आरोपी क्र.१ अशोक दुर्गय्या कोकेरवार व आरोपी क्र.२ स्वप्नील अशोक कोकेरवार यांच्याविरुद्ध दोषारोप निश्चित केले. सदरचा दोषारोप आरोपींना त्यांच्या भाषेत वाचून व समजावून सांगितला. आरोपींनी गुन्हा नाकबूल केला व खटला पुढे चालविण्याची विनंती केली.

५. आरोपींविरुद्धचा गुन्हा सिद्ध करण्याकरिता अभियोग पक्षाने केवळ एका साक्षीदारास तपासले व त्यानंतर नि.क्र.३० येथे पुरसिस देवून पुरावा बंद केला. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ अन्वये स्पष्टीकरणासाठी आरोपींना विचारण्यात आलेल्या प्रश्नांना आरोपींनी दिलेले उत्तर यावरुन आरोपींचा बचाव पूर्णपणे आरोप नाकारल्याचा आहे.

६. अभिलेख पडताळले. अभियोग पक्षातर्फे विद्वान अतिरिक्त सरकारी अभियोक्ता श्री. एस.डी. गावडे व आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. यु. एस. गलबले यांचा युक्तीवाद ऐकला.

७. खटल्यातील तथ्य पाहता, माझ्यापुढे खालील मुद्दे उपस्थित होतात व त्यावरील निष्कर्ष मी खालील कारणांच्या आधारे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक २७/०१/२०२३ रोजी संध्याकाळी ७.०० वाजातच्या दरम्यान मौजा बंदुकपल्ली येथे आरोपींनी त्यांचे समान उध्दीष्ट साध्य करण्याच्या हेतुने फिर्यादी रमेश दुर्गय्या कोकेरवार यांच्यावर उद्देशपूर्वक जीवे मारण्याच्या उद्देशाने हल्ला केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | नाही. |
| २. | दिनांक २७/०१/२०२३ रोजी दरम्यान आरोपींनी त्यांचे समान उध्दीष्ट साध्य करण्याच्या हेतुने फिर्यादीला जीवे मारण्याच्या उद्देशाने धमकी दिली, असे | |

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| | अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय? | नाही. |
| ३. | आदेश काय ? | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमीमांसा

**मुद्दा क्र. १ ते ३ बाबत :–**

८. आरोपींच्या वकिलांनी ग्रामीण रूग्णालय, मुलचेरा यांनी दिलेला जखमांचा अहवाल (नि.क्र.२८) व घटनास्थळ पंचनामा/गुन्हयाच्या तपशीलाचा नमुना (निशाणी क्र.२९) हे दस्ताऐवज मान्य केले. त्यामुळे घटनास्थळाबाबत आणि वैद्यकीय प्रमाणपत्राबाबत तसेच जप्तीबाबत आरोपींना कोणताही वाद नाही.

९. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ रमेश (निशानी क्र.२७) यांना तपासण्यात आले. साक्षीदार क्र. १ यांनी त्यांच्या सरतपासात कथन केले की, आरोपी अशोक हा त्यांचा भाउ व आरोपी स्वप्नील हा त्यांचा पुतण्या आहे. घटना दोन वर्षापूर्वी घडली. घटना संध्याकाळी ७.०० वाजता त्यांच्या घरासमोर घडली. त्यांच्यात व आरोपींमध्ये भांडण झाले होते. त्यादरम्यान ते पडले व त्यांच्या डोक्याला मार लागला. त्यांना दवाखान्यात

नेण्यात आले. दवाखान्यात त्यांचे बयाण घेण्यात आले. फिर्यादीने अभियोग पक्षाला मदत केलेली नाही म्हणून सहाय्यक सरकारी वकिलांनी त्यांची उलटतपासणी घेतली. त्यामध्ये त्यांनी आपल्या बयानातील अधोरेखीत भाग अ नाकारला. त्यांनी हे नाकारले की, त्यांचे आणि आरोपींचे भांडण झाले असता आरोपी अशोकने कु-हाडीने त्यांच्या डोक्यावर वार केला आणि आरोपी स्वप्नील ने त्यांना मारहान केली.

१०. फिर्यादी साक्षीदार क्र.१ हे अभियोग पक्षाला मदत करीत नाहीत. याशिवाय फिर्यादी यांच्यावर उद्देशपूर्वक जीवे मारण्याच्या उद्देशाने हल्ला केला व जिवे मारण्याच्या उद्देशाने धमकी दिली असल्याबाबतचा कुठलाही पुरावा अभियोग पक्षाने सादर केला नाही. फक्त जखमांचा अहवाल, घटनास्थळ व जप्ती मान्य केल्यामुळे आरोपींना दोषी ठरविणे योग्य होणार नाही.

११. वरील परिच्छेदांमध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, आरोपींविरुद्ध भारतीय दंड संहीतेचे कलम ३०७ व ५०७ सहकलम ३४ अन्वये दोषारोप सिद्ध होण्यासाठी कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे आरोपींची निर्दोष मुक्तता होण्यास ते पात्र ठरतात. म्हणून मी मुद्दे क्र. १ व २ चे उत्तर नकारार्थी देत आहे आणि मुद्दा क्र. ३ चे उत्तराकरिता मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) **आरोपी क्र.१ अशोक दुर्गय्या कोकेरवार व आरोपी क्र.२ स्वप्नील अशोक कोकेरवार** यांची मुलचेरा पोलीस स्टेशन येथे नोंदविलेला गुन्हा क्र. ७/२०२३ वरुन दाखल झालेल्या प्रस्तुत खटल्यातून भारतीय दंड संहीतेचे कलम ३०७ आणि ५०७ सहकलम ३४ अन्वये शिक्षा असलेल्या आरोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२) आरोपींचे बंधपत्र व जामीन रद्द करण्यात येते.

३) जप्त करण्यात आलेल्या लोखंडी पात्याची कु-हाड चा अपिल कालावधीनंतर जिल्हा न्यायदंडाधिकारी, गडचिरोली यांना विल्हेवाट लावण्यासाठी पाठविण्यात यावी.

४) जप्त करण्यात आलेला इतर मुद्देमालाचा अपिल कालावधी नंतर नाश करण्यात यावा.

५) न्यायालयाच्या सदरच्या न्यायनिर्णयाविरुद्ध अपील दाखल झाल्यास जेव्हा केव्हा उच्च न्यायालय नोटीस देईल, तेव्हा न्यायालयासमोर उपस्थित राहण्याकरीता आरोपीने फौजदारी प्रक्रीया संहीतेच्या कलम ४३७-अ (भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४८१) प्रमाणे रक्कम ₹१५,०००/- प्रत्येकीचे बंधपत्रासह जमानतपत्र द्यावयाचे आहे. सदरच्या जमानतपत्राचा अंमल सहा महिन्यांकरीता राहील.

६) फौजदारी प्रक्रीया संहीतेच्या कलम ३६५ (भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४०६) अन्वये सदर न्यायनिर्णयाची प्रत जिल्हा दंडाधिकारी, गडचिरोली यांना पाठविण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत केला.)

Digitally signed by ROHAN BALKRISHNA REHPADE
Date: 2026.03.23 16:13:14 +0530

अहेरी.
दिनांक - २३/०३/२०२६.

**(रोहन बा. रेहपाडे)**
अतिरिक्त सत्र न्यायाधीश
अहेरी.

– – – – –

**प्रमाणपत्र**

मी खात्रीपूर्वक असे कथन करते की, पी.डी.एफ. फाईल मधील न्यायनिर्णय हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे तंतोतंत शब्दशः बरोबर आहे.

न्यायालयाचे नांव :– अतिरिक्त सत्र न्यायाधीश, अहेरी.

लघुखेकाचे (श्रेणी–२) नांव :– श्री. जे.एन. सावरकर.